**अग्निशमन व विद्युत विशेष समितीची सोमवार दिनांक 22.05.2017 रोजी दुपारी 3.0 वाजता डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या स्थगित सभेचा अहवाल.**

सभेत मा.उपमहापौर श्री.दिपराज पार्डीकर, मा.सभापती श्री.ॲड संजयकुमार बालपांडे यांचे सह मा.उप सभापती श्री.प्रमोद चिखले, मा.सदस्य श्री.राजकुमार साहु, मा.सदस्या श्रीमती वनिता दांडेकर, मा.सदस्या श्रीमती सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन अंसारी, मा.सदस्या श्रीमती ममता सहारे आणि विभागाकडून अपर आयुक्त श्री.कुंभारे, अति.उपायुक्त श्री. दांडेगावकर, सहा. आयुक्त, सा.प्र.वि.श्री.धामेचा, अग्निशमन अधिकारी श्री.चंदनखेडे तसेच सर्व स्थानक अधिकारी अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली. सुरूवातीला सर्व समिती सदस्य आणि अधिकारी, परिचय करून घेण्यात आला. तद्नंतर मा.सभापती यांनी विषयपत्रिकेवरील विषयाचा आढावा घेण्यास सुरूवात केली.

विषय क्र.1:–स्थापना विभाग जाहिरात क्र.45/ज.स./2017 दि. 11.05.2017 नुसार अग्निशमन सेवेतून सेवानिवृत्त कर्मचा–यांना कंत्राटी तत्वावर भरती करण्याबाबतच्या विषयावर चर्चा करणे

या विषयाच्या अनुषंगाने सहा.आयुक्त सा.प्र.वि. यांनी माहिती देतांना सांगितले, अग्निशमन सेवेतून सेवानिवृत्त कर्मचा–यांना कंत्राटी तत्वावर भरती करण्याबाबत 11 मे 2017 रोजी जाहिरात देण्यात आली होती. या अनुषंगाने जानेवारी 2016 चे शासनाचे परिपत्रक आहे. शासन निर्णयाप्रमाणे कंत्राटी पध्दतीवर ही भरती करावयाची आहे. भरती घेत असतांना उमेदवारांच्या शारिरीक क्षमतेची चाचणी सुध्दा घेण्यात येईल. हा विभागाचा प्रस्ताव असून जोपर्यंत पदोन्नती होत नाही तोपर्यंत अशाप्रकारे जाहिरातीने नियुक्ती देण्यात येईल. न्यायालयाचे निर्देश असल्यामुळे या प्रक्रियेला वेळ लागणे योग्य होणार नाही असेही ते म्हणाले.

यावर मा.उपसभापती श्री. चिखले यांनी आक्षेप घेतला, त्यांनी संबंधितांना विचारणा केली की अग्निशमन विभाग हा फार जबाबदारीचा विभाग आहे. आग विझविण्याची एखाद्या सेवानिवृत्ती झालेला 60 वर्षाचा व्यक्ति ही जबाबदारी कशी काय पेलू शकतो. त्याची शारिरीक क्षमता आणि मानसिकदृष्टया कमकुवत झालेली असल्याने तो फायरची जबाबदारी घेवू शकतो काय? असा प्रतिप्रश्न करून अशाप्रकारे देण्यात आलेली जाहिरात रद्द करण्यात यावी असे सांगितले तसेच सुचित केले की 60–70 वयोमान असलेल्या उमेदवार पेक्षा 30 ते 40 तरूण युवकांना प्राधान्य देण्यात यावे आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी अनुभवी व्यक्ति सुध्दा घेण्यात यावे.

अपर आयुक्त श्री.कुंभारे यांनी सांगितले कि, हायकोर्टाच्या निर्देशानुसार सहा महिन्याच्या आत पदे भरावयाची आहेत त्या संदर्भाने विभागाला कार्यवाही करावयाची आहे. हायकोर्टाने दिलेल्या डेडलाईनपर्यंत हायकोर्टाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करून जाहिरातीद्वारे नियुक्त्या द्यावयाच्या आहेत. जी भरती करण्यात येणार आहे त्यात अग्निशमन सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा–यांतून घेतलेल्या उमेदवारांना आग विझविण्यासंबंधाने कामे करावयाची नाहीत. विभागाकडे मोठया प्रमाणात येणा–या विहिरीचा गाळ काढण्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांना कामे करावयाची आहेत. नवीन मुलांची भरती घेतली तर प्रश्न उद्‌भवू शकतो असेही त्यांनी सांगितले.

मा.सभापती यांनी सभेत निर्देशित केले कि, सेवानिवृत्त कर्मचा–यांची कंत्राटी पध्दतीने भरती करीत असतांना जेथेजेथे पदाची भरती अपेक्षेप्रमाणे होत नसेल तर दुस–या पर्यायाने म्हणजेच या पदासाठी कंत्राटी पध्दतीवर अर्हता पुर्ण करणारे इतर युवा उमेदवारामधून सुध्दा या पदाची भरती प्रशासनाने करावी त्याकरिता रितसर प्रस्ताव स्थायी समितीला सादर करण्यात करण्यात यावा आणि हा विषय निकाली काढण्यात यावा या सुचनेनुसार हा विषय मंजूर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

विषय क्र. 2:–31.03.2017 ते आजपावेतो अग्निशमन विभागाचे स्टोअर कार्यालयामार्फत कोणकोणते साहित्य खरेदी करण्यात आले व कोणत्या दरानुसार खरेदी करण्यात आली याबाबत चर्चा करणे

या विषयाच्या अनुषंगाने अग्निशमन अधिकारी यांनी माहिती दिली कि, स्टेशनरी साहित्य, ट्रेनिंग सेंटरकरिता लागणारे साहित्य, झेरॉक्स पेपर, पेपर बास्केट इ. किरकोळ साहित्याची कोटेशनद्वारे खरेदी करण्यात आली. याकरिता विभागामार्फतच प्रोव्हीजन दिली जाते.

या संदर्भात मा.सभापती यांनी निर्देशित केले कि, अग्निशमन विभागाचे अंदाजपत्रक मुळातच कमी आहे. त्यातुन जर अशा प्रकारचे खर्च केला जात असेल तर ते बरोबर नाही. कुठलीही खरेदी करण्याच्या पूर्वी समितीला अवगत करण्यात यावे.

विषय क्र.3:– अग्निशमन विभागातील सब ऑफीसर्स तसेच स्टेशन ऑफीसर्स चा कोर्स म.न.पा. तर्फे केलेले किती अधिकारी कर्मचारी कार्यालयीन कामे करीत आहेत व किती वर्षापासुन तसेच त्यांना शिफ्ट डयुटीवर पाठविण्यातबाबत चर्चा करणे.

या विषयाच्या अनुषंगाने अग्निशमन अधिकारी यांनी माहिती दिली कि, 13 कर्मचा–यांनी स्टेशन ऑफीसर्सचा कोर्स केलेला आहे. हे कर्मचारी कार्यालयीन कामे करीत आहेत. स्टेशन ऑफीसर्सच्या व्यतिरिक्त या अधिका–याकडून कार्यालयीन कामे सुध्दा करून घेत आहे. हे सुध्दा जबाबदारीचे काम आहे.

या संदर्भात मा.सभापती यांनी निर्देशित केले कि, फिल्डमध्ये काम करणा–या कर्मचा–यांची कमतरता असून सुध्दा प्रशिक्षित कर्मचा–यांना कार्यालयीन कामामध्ये लावून त्यांना त्यांच्या पदाचे काम न देणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करणे आहे. त्या प्रशिक्षित कर्मचा–यांना त्यांच्या पदाची जबाबदारी देण्यात यावी. या अनुषंगाने अग्निशमन विभागातील सब ऑफीसर्स तसेच स्टेशन ऑफीसर्स चा कोर्स म.न.पा.तर्फे ज्या ज्या अधिका–यांनी केलेला आहे त्याची एक यादी समितीला पुरविण्यात यावी.

विषय क्र.4:– म.न.पा. हद्दीतील हॅन्ड्रन्टच्या सद्यःस्थितीबाबत ओ.सी.डब्लु.सोबत चर्चा करणे तसेच मा. सभापतींचे परवानगीने वेळेवर येणारे विषय

मा.उप सभापती यांनी सांगितले कि, आग लागल्यानंतर आग विझविण्यासाठी जवळपास पाण्याची व्यवस्था करून देण्या–या हॅन्ड्रन्टची व्यवस्था राहिलेली नाही. त्यामुळे आग विझविण्यासाठी यंत्रणेला वेळ लागतो. यामुळे जनतेमध्ये विभागाविषयी रोष वाढलेला आहे. करिता शहराच्या मध्यभागी गांधीबाग, इतवारी मुख्य बाजारपेठ आणि गांजाखेत या ठिकाणी हॅन्ड्रन्टची व्यवस्था करण्यात यावी असे त्यांनी सुचविले तसेच शासनाला जो आकृतीबंध पाठविण्यात आलेला आहे आणि त्याकरिता जे सेवा भरती नियम दिलेले आहेत त्यामुळे नागपूर आणि विदर्भाच्या युवकांवर अन्याय होवू नये या अनुषंगाने चर्चा करण्यात यावी.

म.न.पा. हद्दीतील हॅन्ड्रन्टच्या सद्यःस्थितीबाबत मा. उप सभापती यांनी सुचविल्याप्रमाणे त्या स्थळांची पाहणी करण्यात येवून ताबडतोब कार्यवाही करण्यात येईल असे अति.उपायुक्त यांनी सांगितले.

शेवटी मा.सभापती यांनी मा.सदस्य श्री. राजकुमार साहू यांनी मागणी केल्याप्रमाणे अग्निशमन स्टेशन अधिकारी आणि सब स्टेशन अधिकारी यांचे नाव आणि दुरध्वनीक्रमांकांची यादी समितीच्या सर्व सदस्यांच्या पुरविण्यात यावी असे सुचित करून मा.सदस्यांच्या तक्रारीला प्राथमिकता देवून काम करण्यात यावे असे निर्देशित करून मा.सभापती यांनी सभा समाप्तीची घोषणा केली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**अग्निशमन व विद्युत विशेष समिती**

अग्निशमन व विद्युत विशेष समितीची शुक्रवार दिनांक 16.6.2017 रोजी दुपारी 12.30 वाजता डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल

सभेत मा. उपमहापौर श्री दिपराज पार्डीकर, मा. सभापती श्री ॲड. संजयकुमार बालपांडे यांचेसह उपसभापती श्री प्रमोद चिखले,मा. सदस्य श्री राजकुमार शाहु, मा. सदस्य श्री लहुकुमार बेहते मा. सदस्या श्रीमती वनिता दांडेकर विभागातर्फे सहा. आयुक्त श्री धामेचा, तथा प्रमुख अग्निशमन अधिकारी, इत्यादी उपस्थित होते.

मा सभापती यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

विषय पत्रिकेतील विषय क्रमांक 1 नुसार अग्निशमन विभागातील मंजूर झालेल्या सरळसेवा नियमाबावत चर्चा करणे या विषयावर विस्तृत चर्चा करण्यात आली या संदर्भात जहिरात करण्यात येत असलेल्यात 6 महिन्याचे पाठ्यक्रम नमुद आहे परंतु तोच पाठ्यक्रम कर्मचा–याकरीता 3 महिन्याचा होता जो त्यांनी केलेला आहे. यामुळे कार्यरत कर्मचा–यावर अन्याय होवू नये करीता मा. आयुक्तांना असलेल्या अधिकारानुसार, शासनाकडून मंजूरी मागून, वा अन्य योग्य मार्गाचा अवलंब करुन ह्या तृटिस दुर करण्यात यावे असा समितीने निर्णय घेतला.

तसेच सरळसेवा भरतीत अत्यंत कमी उमेदवार पात्र ठरले आहे सध्याची विभागाची आवश्यकता पाहता कर्मचारी कंत्राटपध्दतीवर नियुक्त करण्याची प्रोसेस करण्यात यावी तसेच सेवा भरतीत स्थानीय लोकांना प्राधान्य मिळावे व स्वंयसेवक म्हणुन जे तरुण आपातकालीन वेळेत विभागाची मदत करतात त्यांना यात प्राधान्य मिळावे, नविन जाहिरात करुन वा अन्य योग्य उपायाचा अवलंब याकरीता करण्यात यावा असे समितीव्दारे निर्देशित करण्यात आले.

सभापती समिती यांनी श्री राजु धर्मपवार यांच्या आलेल्या तक्रारीचे वर्णन केले ज्यात वरिष्ठ लिडींग फायरमन च्या पदावर पदोन्नती करतांना झालेल्या अन्यायाबावत म्हटले आहे पदोन्नत करण्यात आलेले श्री विनोद ठवरा जाधव यां दोघांनीही समकक्ष प्रशिक्षण प्राप्त केले आहे परंतु श्री पवार यांना मनपा सेवतेत असतांना 3 महियाचा पाठ्यक्रम उत्तीर्ण केला आहे आणि जांधव यांनी नोकरीत रुजु होणे आधी खाजगी विद्यार्थी म्हणुन 6 महिन्याचे प्रशिक्षण केले आहे परंतु दोन्ही प्रशिक्षण समकक्ष आहे तसेच सेवेत कार्यरत कर्मचा–यांना अनुभव असल्यामुळे 3 महिन्याचेच प्रशिक्षण करावे लागते असे शासनाचे नियम आहे ह्या बाबीचा विचार करुन प्रशासनाने या बाबीबद्दल राज्य शासनाकडून विशेषतः महाराष्ट्र अग्नीशमन संचालनालय यांचे कडून मार्गदर्शन प्राप्त करावे व ही विसंगती दुर करुन योग्य निर्णय घ्यावा असे निर्देशित केले.

विमोचक पदावर पदोन्नती 24 वर्ष कालबध्द पदोन्नतीपासुन /वेतनश्रेणीपासुन वंचीतावर अन्याय झाल्याबद्दल कनिष्ठ कर्मचारी वरिष्ठ झाल्याबद्दल कर्मचारी यांनी प्रस्तुत केलेल्या अर्जावर चर्चा करण्यात आली यावर योग्य प्रस्ताव देण्याचे निर्देशित करण्यात आले. तसेच सेवा प्रवेश नियमात आवश्यक तीथे त्रृटी दुरुस्त करुन तो ठराव पुन्हः मंजूरीस्तव महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यास्तव म.न.पा. कलम 30 नुसार सभागृहाच्या समक्ष ठेवण्यास ही समिती निर्णय घेत आहे. असा निर्णय समिती व्दारे सभेत घेण्यात आला.

अग्निशमन विभागातुन निर्गमीत होणा–या विभिन्न पमाणपत्र जसे परिपुर्णता प्रमाणपत्र इत्यादी बाबत आढावा घेणे संदर्भात विषयावर चर्चा करण्यात आली मा. सदस्याव्दारे सांगण्यात आले की काही एजेन्सी शिफारसी प्रमाणे कार्य न झाल्यावर सुध्दा बोगस प्रमाणपत्र देत आहे कोणतेही अग्निशमन यंत्र जे लावलेले दाखविले जातात ते लावले जात नाही किंवा बंद असतात, किंवा कुठे यंत्र नसतात काही ठिकाणी नागरिकांना निवासी मंजूरी घेवून व्यवसाय करीत आहे , ह्यावर विभागाने लक्ष दिले पाहिजे समिती या करीता निरीक्षण दौरा घेणार आहे याची सभापती यांनी परवानगी द्यावी असे सदस्यांनी विनंती केली. यानंतर नियमानुसार आवश्यक सर्व ईमारतीला विभागाची स्थायी मंजूरी घेणे आवश्यक राहील. 1615 वर्गफुट च्या क्षेत्रफळात असणा–या सर्व व्यावसायीक प्रतिष्ठान तसचे 15 मिटर उंच ईमारतीच्या संदर्भात नियमानुसार मंजूरी घेणे आवश्यक राहील. यावेळी सदस्यांनी मागणी केली की 1.4.2017 पासुन 62 लोकांना विभागाने मंजूरी दिली आहे त्याबाबत सर्व प्रकरणाची माहिती त्यांना देण्यात यावी तसेच यानंतर सर्व नाहरकत प्रमाणपत्र,परिपुर्तता प्रमाणपत्र,सुचनापत्र,नुतणीकरण प्रमाणपत्र अन्य मंजूरीही सभापती यांचे निदर्शनात आणून दिल्याशीवाय देण्यात येवू नये असा निर्णय समितीव्दारे घेण्यात आला.

यावेळी मा. उपमहापौर यांनी चुनाओली येथे श्री बांगरे यांची असलेली कोणत्याही क्षणी पडणा–या ईमारतीची बाब मांडली यावर योग्य कार्यवाहीचे निर्देशित करण्यात आले. फायरब्रीग्रेड तर्फे अपेक्षीत कामाच्या संदर्भात सर्व माहिती उंच इमारती,मॉल, आदी संबंधात समिती समोर ठेवण्यात यावी असेही निर्देशित करण्यात आले.

यानंतर सभेच्या समाप्तीची घोषणा करण्यात आली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
अग्निशमन व विद्युत विशेष समिती

अग्निशमन व विद्युत विशेष समितीची गुरुवार दिनांक 29.6.2017 रोजी दुपारी 3.00 वाजता डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल

सभेत मा. सभापती श्री ॲड. संजयकुमार बालपांडे यांचेसह उपसभापती श्री प्रमोद चिखले,मा. सदस्य श्री राजकुमार शाहु, मा. सदस्य श्री लहुकुमार बेहते मा. सदस्या श्रीमती ममता सहारे मा. सदस्य श्रीमती सय्यदा बेगम विभागातर्फे कार्यकारी अभियंता विद्युत तथा विभागाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

मा. सभापती यांनी सभेची कार्यवाही सुरु केली. तथा विभागाच्या कार्यासंबंधात विस्तृत माहिती देण्यास सांगीतली त्या वरुन विभागाव्दारे प्रोजेक्टरच्या मदतीने विभागाकडे असणारे कार्य, संसाधनांची सध्यः स्थिती, कर्मचारी वर्ग, एल.ई.टी संदर्भात होत असलेल्या कामाचे संपूर्ण वर्णन करण्यात आले यात झोन वाईज कोणते कंत्राटदार काम करीत आहे या बाबत माहिती देण्यात आली

यावेळी सभापती यांनी कोणत्या झोन मध्ये कोणते कंत्राटदार काम करीत आहे कोणते कर्मचारी काम करीत आहे त्यांचे विस्तृत माहिती सर्व समिती सदस्यांना देण्याचे निर्देशित केले. आउट भागात वा ज्या पोलवर लाईट नाही तेथील पोलवर प्राधान्याने लाईट लावण्यात यावे असे सभापती यांनी निर्देशित केले.

एल.ऐ.डी. लाईट बदलवीतांना संबंधीत नगरसेवकाला याची पुर्व जाणीव देण्यात यावी असेसर्व जागी करण्यात यावे. असेही सभापती यांनी निर्देशित करण्यात केले.

तसेच चेकर ची यादी तथा तेथील काम करणारे संबधीत कर्मचारी यांची यादी सर्व सदस्यांना त्यांचे टेलीफोन नंबरासह देण्यात यावी. असे सभेत निर्देशित करण्यात आले.

यानंतर सभेचे समापत करण्यात आले

सचिव,
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
अग्निशमन व विद्युत विशेष समिती

अग्निशमन व विद्युत विशेष समितीची गुरूवार दिनांक 21.12.2017 रोजी दुपारी 4.00 वाजता डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या स्थगित सभेचा अहवाल.

सभेत मा.सभापती श्री.ॲड संजयकुमार बालपांडे यांचे सह मा.उप सभापती श्री.प्रमोद चिखले, मा. सदस्य श्री.हरीश ग्वालबंशी, मा.सदस्य श्री.राजकुमार साहु, मा.सदस्या श्रीमती ममता सहारे, मा.सदस्या श्रीमती सय्यदा अंसारी आणि विभागाकडून अपर आयुक्त श्री.कुंभारे, प्रमुख अग्निशमन अधिकारी श्री. राजेंद्र उचके, प्रमुख अग्निशमन अधिकारी श्री.चंदनखेडे, कार्यकारी अभियंता(विद्युत), श्री.संजय जैस्वाल, कार्यकारी अभियंता श्री.नरेश बोरकर व इतर अधिकारी अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली. तद्नंतर मा.सभापती यांनी विषयपत्रिकेवरील विषयाचा आढावा घेण्यास सुरूवात केली.

विषय क्र.1:—अग्निशमन विभागामार्फत करण्यात येणारे विहीर सफाईचे कार्य आरोग्य विभागामार्फत करण्यात यावे यावर चर्चा करीत असतांना मा.सभापती यांनी सांगितले की अग्निशमन विभागामार्फत विहिरी स्वच्छ करण्याची कामे केली जातात यात काही मा.सदस्यांचे म्हणणे असे आहे की फायर विभागाचे कर्मचारी या कामात गुंतल्यामुळे इतर कामे करू शकत नाही. आरोग्य विभागाने करावे परंतु आरोग्य विभागही याकडे दुर्लक्ष करीत आहेत. झोन स्तरावर नगरसेवकांच्या फंडातून पंप घेवून हे काम झोन स्तरावर करावे की अग्निशमक विभागामार्फत करण्यात यावे यावर मा.सदस्यांनी चर्चा करावी.

मा.सदस्य श्री.हरीश ग्वालबंशी यांनी सुचित केले कि, माझा आऊटर प्रभाग असून प्रभागात 27—28 सफाई कर्मचारी आहेत. प्रभागात चोकेजची कामे पुष्कळ असतात आणि बीटनुसार स्वच्छतेची कामे केली जातात त्यातही कर्मचा—यांची कमतरता भासते त्यामुळे ही कामे अग्निशमन विभागामार्फतच केली जावीत. प्रभागात दिवसेंदिवस विहिरींचा वापर कमी होत चालला आहे त्यात जर ज्या काही विहीरांचा वापर होत आहे आणि गडरलाईनच्या लिकेजेसमुळे पाणी खराब होत असेल आणि त्याच्या सफाईकरिता जर शुल्क आकारले जात असेल तर ते योग्य होणार नाही.

मा.उप सभापती श्री.चिखले यांनी सुचित केले की अग्निशमन विभागाला ऐवजदार सफाई कर्मचारी दिलेले आहे त्यामुळे विहिरीची सफाई करण्याकरिता कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे. विहिरीची सफाई अग्निशमन विभागानेच करावी अशी काही आग्रह नाही मात्र पाणी खराब झालेल्या विहिरीची सफाई होणे गरजेचे आहे.

अपर आयुक्त श्री.कुंभारे यांनी माहिती देतांना सांगितले, पूर्वी खाजगी विहिरीचा उपसा करण्याकरिता 500 रू.ची आकारणी केली जात होती मात्र 2014 मध्ये निर्णय घेण्यात आला की आरोग्य विभागाने जर प्रमाणपत्र दिले की विहिरीचे पाणी खराब झालेले आहे तर त्या विहिरींची सफाई फ्री ऑफ कॉस्टमध्ये करण्यात यावी परंतु सगळया विहिरींच्या बाबतीत अशा प्रकारचे प्रमाणपत्र देण्यात येत आहे. अनेक ठिकाणी नागरिकांच्या खाजगी गडरलाईनमुळे सुध्दा विहिरीचे पाणी खराब होत असतांना फ्री ऑफ कॉस्टमध्ये विहिरीची सफाई करण्यात येत आहे. यामुळे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे कर्मचा—यांना त्यांच्या प्रत्यक्ष कामापेक्षा विहिरी

सफाईचे कामे करावी लागत आहेत तसेच रोज जवळपास 17–18 विहिरीची सफाई केली जात असल्यामुळे लाखो रूपयाचा भुर्दंड महानगरपालिकेला बसत आहे. याकरिता कुठली पाईपलाईन लीक झाल्यामुळे विहिरीचे पाणी खराब होत आहे त्याची शहानिशा करूनच देण्यात यावी. सरकारी विहिरीची सफाई मनपा आपल्या निधीतून करेल परंतु खाजगी विहिरी असेल तर कमीत कमी चार्जेस असावेत असेही ते म्हणालेत.

अग्निशमन अधिकारी श्री.चिखले यांनी माहिती देतांना सांगितले, हनुमाननगर, नेहरूनगर आणि लक्ष्मीनगर या झोन मध्ये विहिरी सफाईच्या बाबतीत सगळयात जास्त तक्रारी आहेत. याबाबत झोन स्तरावर निर्णय घेण्यात आल्यावरही कार्यवाही करण्यात येत नाही.

तद्नंतर मा. सभापती यांनी निर्देशित केले, अग्निशमन विभागामार्फत विहिरी स्वच्छ करण्याचे कामे केली जातात ही कामे आरोग्य विभागामार्फत करण्यात यावे. अग्निशमन विभागाला दररोज 17–18 विहिरी उपसा कराव्या लागतात. त्यासाठी लाखो रूपयाचा भुर्दंड लागतो. याकरिता कोणत्या कारणामुळे विहिरीचे पाणी खराब झाले याचा स्पष्ट उल्लेख प्रमाणपत्रामध्ये करण्यात यावा. सरकारी विहिरी या मोफत साफ करण्यात याव्यात. मात्र खाजगी विहिरींकरिता खाजगी कारणांमुळे पाणी खराब होत असेल तर त्यांच्याकडून नाममात्र शुल्क आकारण्यात यावे असे निर्देश अग्निशमन समिती सभापती यांनी दिले.

विषय क्र.2:–विभागाकडे अस्तित्वात असलेली Fire Alert Hotline Security System प्रणालीचे उन्नतीकरणे करणे(Upgradation)याबाबत चर्चा केली असता प्रमुख अग्निशमन अधिकारी यांनी माहिती देतांना सांगितले कि, फायर सेफ्टी ॲक्टनुसार ज्या इमारतीची उंची 15 मीटर अथवा त्याच्यापेक्षा जास्त आहे तसेच, ज्या व्यावसायिक प्रतिष्ठानाचे बांधकाम 150 चौ.मी. पेक्षा जास्त आहे. अशा इमारतींना अग्निशमन विभागाचे ना–हरकत प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. परंतु असे केले जात नाही त्यामुळे अशा इमारतींना सुचना, नोटीसेस् दिलेल्या आहेत. त्या इमारतीमध्ये फायर सेफ्टी लावले गेल्यानंतर सहा महिन्यानंतर कम्प्लायन्स सर्टीफिकेट घ्यावयाचे आहे. हे जर त्यांनी केले नाही तर विभागाचा अधिकारी जावून त्याची पाहणी करून येईल. हया पध्दतीमध्ये बराच वेळ जात असल्यामुळे नव्याने आलेल्या प्रणालीमध्ये फायर अलर्ट हॉटलाईन सेक्युरिटी सिस्टिम असणे आता गरजेचे झाहे आहे. या प्रणालीद्वारे त्या इमारतींची सर्व माहिती अग्निशमन विभागाकडे एका चीपद्वारे उपलब्ध असणार आहे. टाकीतील पाणी, अग्निशमन सेवा इत्यादिबाबत त्यात माहिती समाविष्ट राहणार आहे. याकरिता ईओयु कॉल करावयाचा आहे असेही त्यांनी सांगितले.

मॉल, हॉस्पीटल, शाळा, कोल्ड स्टोरेज, व्यावसायिक प्रतिष्ठाने यापैकी कोणत्या इमारतींना कम्प्लायन्स प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. या इमारतीमार्फत रिनीव्हलकरिता अर्ज येत आहे किंवा नाही याबाबतची संपुर्ण यादी देण्यात यावी असे मा.सदस्या श्रीमती ममता सहारे आणि मा.सदस्य श्री. राजकुमार साहू यांनी सुचित केले असता संबंधित अधिका–यांनी ही यादी वेबसाईटवर उपलब्ध असून मा.सदस्यांना उपलब्ध करून देता येईल असे सांगितले.

मा.सभापती यांनी सभेत निर्देशित केले, अग्निशमन विभागाकडे अस्तित्वात असलेली फायर अलर्ट हॉटलाईन सेक्युरिटी सिस्टिम लावण्यासाठी नागरिकांना प्रवृत्त करावे. परंतु ज्या

इमारतीची उंची 15 मीटर पेक्षा जास्त आहे अशा सर्व जुन्या व नवीन असा फरक न करता सर्व इमारतींना फायर अलर्ट सिस्टिम लावणे बंधनकारक करण्यात येवून इमारतींना एनओसी देण्यात याव्यात.

तद्नंतर नव्याने आलेल्या प्रणालीमध्ये फायर अलर्ट हॉटलाईन सेक्युरिटी सिस्टिम प्रणालीचे उन्नतीकरण करण्याचा विषय मंजूर करण्यात यावा अशी समितीमार्फत शिफारस करण्यात आली.

विषय क्र.3:– त्रिमुर्तीनगर स्थानकाला सुरू करण्याबाबत सभेत चर्चा करतांना कार्यकारी अभियंता श्री.बोरकर यांनी माहिती देतांना सांगितले कि, 3लक्ष 92 लक्षाची याकरिता तरतूद करण्यात आली आहे. यात काही राशींची बचत होवून त्रिमुर्तीनगर येथील अग्निशमन स्थानकाच्या इमारतीचे बांधकाम मार्च 2018 पर्यंत पुर्ण होईल असे त्यांनी सांगितले.

विषय क्र.4:–वाठोडा अग्निशामक स्थानकाचे इमारतीचे बांधकाम कार्यास विलंबाबाबत चर्चा केली असता कार्यकारी अभियंता श्री.बोरकर यांनी माहिती देतांना सांगितले कि, वाठोडा, गंजीपेठ येथील स्थानक इमारतीचे पुर्ननिर्माण करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. परंतु जीएसटीमुळे सीएसआर रिवाईज झाले आहे. नवीन सीएसआर तयार न झाल्यामुळे तांत्रिक मंजुरी मिळण्यास विलंब होत आहे.

विषय क्र.5:–लकडगंज स्थानकाचे इमारतीचे पुनर्बांधकाम सुरू करण्यास या स्थानकाला नवा बगडगंज, म.न.पा.शाळेत स्थानांतर करण्यास स्थानकाचे आवश्यकतेनुसार या शाळेची किरकोळ दुरूस्ती करणेबाबत चर्चा केली असता लकडगंज स्थानकाचे इमारतीचे पुनर्बांधकाम सुरू करण्यास या स्थानकाला नवा बगडगंज, म.न.पा.शाळेत स्थानांतर करण्यास झोन स्तरावरून कार्यवाही झालेली नाही असे प्रमुख अग्निशमक अधिकारी यांनी सांगितले.

मा.सभापती यांनी निर्देशित केले, या अनुषंगाने झोन कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्यात यावा. पाचपावली स्थानकची जर्जर झालेली इमारत आणि तेथे चाललेला गैरवापर लक्षात घेता या संदर्भाने झोनचे सहा.आयुक्त, डेप्टी इंजिनिअर यांची बैठक लावण्यात यावी.

तद्नंतर कार्यकारी अभियंता श्री.बोरकर यांनी सांगितले कि लकडगंज येथे स्थानक बांधकाम करीत असतांना एमईसीबीचा ट्रान्सफार्मर मध्ये आलेला आहे. तो ट्रान्सफार्मर शिफ्ट करण्याविषयी एमईसीबीला कळविले असतांना त्यांनी 14 लक्ष रू.ची डिमांड दिली आहे. महानगरपालिकेच्या जागेवर विना परवानगी ट्रान्सफार्मर लावलेला आहे तरीही एमईसीबी मार्फत पैश्याची मागणी केली जात असल्यामुळे आपल्या स्तरावर पत्र देण्यात यावे असे ते म्हणालेत.

या अनुषंगाने मा.सभापती यांनी निर्देशित केले, समितीचा असा निर्णय आहे की अपर आयुक्त कुंभारे साहेब यांनी पाठपुरावा करून त्या जागेवरील ट्रान्सफार्मर उचलण्याबद्दल योग्य कार्यवाही करावी.

विषय क्र.6:–एल.ई.डी.पथदिपांच्या प्रगती कार्याबाबत चर्चा

विषय क्र.7:– विविध ठिकाणी सोडियम दिव्यांऐवजी एल.ई.डी. दिवे लावण्याबाबत चर्चा केली असता मा.सदस्य श्री.हरीश ग्वालबंशी यांनी एल.ई.डी. पथदिपांचा पुरवठा कां बंद झालेला आहे अशी विचारणा केली असता कार्यकारी अभियंता श्री.जैस्वाल यांनी सांगितले की एल.ई.डी.लाईट आणि पोल लावण्यासाठी कंत्राट दिल्यानंतर करारनाम्यानुसार एस्ट्रा अकाऊंट आणि बॅक गॅरंटी द्यावयाची होती परंतु हया दोन्ही गोष्टी महानगरपालिका करू शकली नाही. त्यामुळे मध्यतंरी काम रेंगाळले. आता लोन घेण्यासाठी शासनाची परवानगी मिळाली असून एस्ट्रा अकाऊंटमध्ये पैश्याची व्यवस्था आणि बॅक गॅरटीची सुध्दा प्रोसेस करीत आहे. त्यामुळे कामाला गती येईल.

मा.सदस्य श्री. राजकुमार साहू यांनी त्यांच्या प्रभागात ब्लॅन्क पोल असून प्रायरिटीवर पोलवरती लाईट लावून देण्याची व्यवस्था करण्यात यावी असे सुचीत केले.

मा.सदस्या श्रीमती ममता सहारे यांनी अग्निशमन विभागात होणा–या नवीन भरतीत पदनिहाय किती जागा आहेत, भरतीची पध्दत काय? या अनुषंगाने लेखी माहिती देण्याविषयी सुचित केले असता या अनुषंगाने लेखी माहिती सामान्य प्रशासन विभागामार्फत संबंधितांना देण्याविषयी कळविण्यात येईल असे प्रमुख अग्निशमन अधिकारी श्री. उचके यांनी सांगितले.

तद्नंतर मा.सभापतीच्या परवानगीने सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**अग्निशमन व विद्युत विशेष समिती**

अग्निशमन व विद्युत विशेष समितीची सोमवार दिनांक 05.02.2018 रोजी दुपारी 3.00 वाजता डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिति सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल

सभेत मा. सभापती श्री ॲड. संजयकुमार बालपांडे यांचेसह उपसभापती श्री प्रमोद चिखले, मा. सदस्य श्री विरेन्द्र कुकरेजा मा. सदस्य श्री राजकुमार शाहु, मा. सदस्य श्री लहुकुमार बेहते मा. सदस्या श्रीमती ममता सहारे मा. सदस्य हरीष ग्वालबशी श्रीमती वनिता दांडेकर विभागातर्फे मा. अति आयुक्त श्री मोहिते कार्यकारी अभियंता प्रकल्प , कार्यकारी अभियंता विद्युत अग्निशमन अधिकारी तथा विभागाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

मा. सभापती यांनी सभेची कार्यवाही सुरु केली. विषय पत्रिकेतील विषय कमाक 1 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत अग्निशमन शुल्क आकारणी व्यतिरिक्त इतर कार्यासाठी आकारण्यात येणारे शुल्कात वाढ करण्याबाबतच्या विषयावर चर्चा करणे या विषयावर विभागासह साधक बाधक चर्चा करण्यात आली या वेळी सदस्य श्री हरीष ग्वालवंशी यांनी नियमाप्रमाणे कोणतेही शुल्कात वृध्दि करत असल्यास त्यांचे शूल्क वृध्दि चार्ट सदस्यांना दयावयास हवे तथा त्या बाबत विस्तृत माहिती समजावुन सांगावयास हवी होती विभागाने तसे केले नसल्यामुळे हया विषयावर विचार करण्यात आला नाही यावेळी विभागाने दरवृध्दि संबंधात माहिती प्रस्तुत केली. 2015-16 च्या वार्षीक उत्पन्नात तथा वर्तमान वार्षीक उत्पन्नात तफावत असल्याचे निदर्शनात आणुन देण्यात आले त्याबाबत विभागाने स्पष्टीकरण प्रस्तुत केले विषयास बहुमताने मंजूरी प्रदान करण्यात आली.

विषय कमाक 2 नुसार त्रिमुर्तीनगर स्थानकाच्या सुरु असलेल्या बांधकामाच्या प्रगतीचा आढावा घेणे तसेच लकडगंज व वाठोडा अग्निशमन स्थानक यांच्या प्राकलनाबाबत चर्चा करणे या विषयावर साधक बाधक चर्चा करण्यात आली प्रकल्प अधिकारी यांनी या विषयावर माहिती दिली की 2 महिन्याच्या आत प्रकल्प पुर्णत्वास जाईल. वाठोडा येथील प्रकल्पाचे डिझाईज तयार झाले असुन टेंडर काढण्याच्या अवस्थेत आहे. क प्रत करीता पैसे भरण्यात आले आहे. याबाबत नकाशा दाखविण्यात आला. येथे कर्मचा-याच्या राहण्याच्या क्वॉटर अधिक प्रमाणात काढावयास हवे होते असे मत प्रकट करण्यात आले. तसेच यानंतर कोणत्याही प्रकल्पात कर्मचा-याचे क्वार्टरची संख्या जास्त प्रमाणात ठेवण्यात यावी असे निर्देशित करण्यात आले. या वेळी प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाच्या जागेत एम.एस.ई.बी ची डिपी हटविण्याकरीता 8 लक्ष रुपयाची मागणी केली असल्याची माहिती दिली यावर चर्चे अंती डिपी हटविण्याकरीता मागणीच्या रकमेचा भरणा नियमानुसार करण्यास समितीने मंजूरी प्रदान केली.

विषय कमांक 3 नुसार सोलर वॉटर हिटर व इतर योजनाबाबत चर्चा करणे या विषयावर विभागाव्दारे माहिती देण्यात आली 3450 सोलर वॉटर हिटर देण्याची स्कीम होती यात 50 परसेंट सबसीडी देण्यात आली होती केंद्र शासनाची स्कीम होती. ती संपल्यानंतर नंतर महानगरपालिकेने सबसीडी देण्याचे मान्य केले. ती स्कीम चालु आहे.

मा. सदस्य श्री शाहू यांनी अग्निशमन केंद्रात रिटायर्ड कर्मचारी यांना ठेवण्यात आले होते त्यांचा सेवाकाळ समाप्त झाल्यानंतर न कार्यरत आहे या बाबत आवश्यक मंजूरी घेण्यापुर्वी बाब समितीच्या निदर्शनात आणून द्यावयास हवी होती परस्पर मंजूरी घेण्यात येवू नये असे मत प्रकट केल्यावरुन सभापती तसेच मा.सदस्य शाहु यांनी यानंतर समितीच्या समक्ष प्रस्तुत केल्याशीवाय मंजूरीस्तव पाठविण्यात येवू नये असे निर्देश दिले.

जगनाडे चौक सेवन स्टार हॉस्पीटलला फायरची मंजूरी कशी देण्यात आली?फायर व्यवस्थेकरीता आवश्यक स्पेस तेथे सोडण्यात आलेले नसल्याचे दिसुन येते  बांधकाम नियमबाह्य असल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते अशा आरोप करीता समिती व्दारे मौका निरीक्षण करण्याच्या आवश्यकेतवर भर दिला. त्यावर सभापती यांनी गुरुवार 8  तारखेला सकाळी 11 वाजता समिती सदस्य ,उपायुक्त, अग्निशमन अधिकारी–यासह निरीक्षण करण्यात येईल याची विभागाने व्यवस्था करावी असे निर्देशित करण्यात आले.

यापुर्वीच्या सभेत ईमारती संबंधात विभागाला माहिती मागीतली होती ती अप्राप्त आहे याकरीता यापुर्वी मागीतलेली सर्व माहिती मा. सदस्यांना पुरविण्यात यावी असे सभापती यांनी निर्देशित केले.

यानंतर सभेच्या समापनाची घोषणा करण्यात आली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
अग्निशमन व विद्युत विशेष समिती